30 MAR 2024

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकीय साहचर्य वृद्धिंगत व्हावे

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची अपेक्षा

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांमध्ये निर्माण होत असलेले संशोधकीय साहचर्य व देवाणघेवाण वृद्धिंगत होत राहावे, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन आणि लिंकेजेसच्या वतीने विद्यापीठातील पेटंटप्राप्त तसेच प्रकल्प अनुदानप्राप्त आणि आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांमध्ये शोधनिबंध प्रकाशित झालेल्या संशोधकांच्या गौरव समारंभात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या आधीपासूनच विद्यापीठातील विविध अधिविभागांतील संशोधकांमध्ये संशोधन सहकार्य सुरू झाले. विशेष म्हणजे विज्ञान शाखांमध्ये अंतर्गत सहकार्यवृद्धीबरोबरच सामाजिक विज्ञान शाखांशीही सहकार्य सुरू झाले. आंतरविभागीय, आंतरविद्याशाखीय संशोधन प्रकल्पांमध्ये वृद्धी होण्याची मोठी आवश्यकता आहे.



कोल्हापूर : विद्यापीठातील संशोधकांच्या गौरवप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सागर डेळेकर.

प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, संशोधकांनी विषयांतर्गत तसेच आंतरविद्याशाखीय संशोधनात घेतलेली आघाडी कौतुकास्पद आहे. ती अबाधित राखण्यासाठी संशोधनात सातत्य ठेवा. पेटंटधारक डॉ. राहुल माने, डॉ. किशोर खोत, डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. संतोष शिंदे, डॉ. कबीर खराडे, प्रमोद कोयले, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. एस.ए. संकपाळ, डॉ. के. डी. कुचे , डॉ. सुनील गायकवाड, अक्षय खांडेकर, डॉ. डोंगळे, डॉ. संतोष सुतार, डॉ. क्रांतीवीर मोरे आणि डॉ. पद्मा दांडगे यांचा गौरव करण्यात आला. पेटंटधारक विद्यार्थिनी गायत्री गोखले हिला विद्यापीठाची 'पेटंटदूत' म्हणून पत्र प्रदान करण्यात आले. डॉ. सागर डेळेकर यांनी आभार मानले.

30 MAR 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोलोली : विद्यापीठाकडून नवीन तयार करण्यात आलेल्या नियमानुसार व्हायवा दिवशीच प्रमाणपत्र मिळण्याचा मान श्रीपतराव चौगुले महाविद्यालयाच्या प्रा. मनिषा सावंत यांना मिळाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 MAR 2024
तरुण भारत

# विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांचा आदर्श घ्यावा : कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे

कोल्हापूर : दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचं कौतुक वाटतं. छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी सतत कार्यरत राहावे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले आहे. नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्समधील पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते. प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रविण पाटील उपस्थित होते. शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आणि विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अरुण शिंदे यांनी परिचय करून दिला. प्रा. अभिजित कांबळे यांनी अहवाल वाचन केले. डॉ. एम. ए. जाधव यांनी पारितोषिक विजेत्यांची नावे जाहीर केली. डॉ. अक्षता गावडे यांनी आभार मानले.

# Two SUK researchers get patent for energy device

Times News Network

**Kolhapur:** Two researchers from Shivaji University Kolhapur's (SUK) received a patent from govt on Thursday for their energy storage device using nano-compositie.

The researchers, Dr Sagar Delekar and Swapnajit Mulik, are from the university's chemistry department.

Mulik said, "Our research is aimed at increasing the capacity of super capacitors by cathodes made from nanocomposites based materials. Nickel cobaltite, cobalt oxide and porous carbon have been used for super capacitor devices. This nano-composite will improve the efficiency of the device and this research will bring about an innovative change in the energy sector."

Dr Sagar Delekar said, "This device is less expensive and will be effective in energy conservation. It will benefit the researchers working in the energy sector and provide solutions to energy problems in the society."

A felicitation ceremony was also organized on behalf of Innovation, Incubation and Linkages of SUK on Friday for researchers who have received patents, project grants and published research papers in international research journals.

Speaking at the felicitation, SUK vice-chancellor Dr Digambar Shirke said, "Research collaboration between researchers from various departments in SUK started way before implementation of National Education Policy (NEP). Such kind of increase in the inter department and interdisciplinary research projects is required."

Pro vice-chancellor Dr Pramod Patil, dean of commerce and management Dr Srikrishna Mahajan and director of Innovation, Incubation and Linkages Center Dr Sagar Delekar were present at the occasion.